ePaper

पुण्यात आदित्य-राज ठाकरेंचे एकत्र बॅनर!

वर्ष - 8 । अंक - 303 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

आतील पानांत

- ऋषभ पंतचा 'छप्परतोड' षटकार!
- पुरनची २९व्या वर्षी क्रिकेटमधून निवृत्ती
- गैरवापर सहन केला जाणार नाही
- हे लग्न लावल्यास वाईट परिणाम होतील

www.mahaenews.com । बुधवार, दि. 11 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

'ऑपरेशन सिंदूर' नंतर भूमिका पटवून देण्यासाठी परदेशात गेलेले प्रतिनिधी मोदींना भेटले...

कामगिरी फत्ते! शाब्बास पठ्ठे!

पंतप्रधानांकडून शाबासकीची थाप: भारताच्या भूमिकेला संपूर्ण जगाचा वाढता पाठिंबा!

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने हाती घेतलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' च्या कारवाईची महत्त्वपूर्ण भूमिका परदेशात पटवून देण्यासाठी गेलेल्या प्रतिनिधी मंडळातील सर्व प्रतिनिधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांना आपल्या दौऱ्याच्या यशस्वीतते बद्दल माहिती दिली. यानंतर या सर्व प्रतिनिधींचे नरेंद्र मोदी यांनी आभार मानले आणि त्यांना शाबासकीही दिली.

पाकड्यांचा दहशतवादी चेहरा...

भारताने दहशतवादाविरोधात घेतलेली भूमिका आणि उचललेली पावले अन्य राष्ट्रांना पटवून देण्यासाठी या प्रतिनिधी मंडळांची रचना करण्यात आली होती. त्यामध्ये सर्वपक्षीय प्रतिनिधी देखील होते. भारताची भूमिका पटवून देत असताना पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा देखील इतर राष्ट्रांना उलगडून दाखवण्याची जबाबदारी किंवा दहशतवादी बुरखा फाडण्याची जबाबदारी या प्रतिनिधींवर होती आणि त्यांनी चोखपणे ती पार पाडली म्हणून नरेंद्र मोदी यांनी त्यांना शाबासकी देखील दिली आहे.

नेमकी काय चर्चा झाली ?

'ऑपरेशन सिंदूर' ची माहिती देण्यासाठी विविध शिष्टमंडळे परदेशात गेली होती. ही शिष्टमंडळे आता भारतात परत आल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी त्यांची भेट घेतली आणि सविस्तर चर्चा केली. काहींना अन्य देशांमध्ये आलेले अनुभव त्याचप्रमाणे भारताला मिळत असलेला वाढता पाठिंबा त्यांनी यावेळी स्पष्ट केला.

दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त..

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला उत्तर देताना भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तानातील दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला केला होता. यानंतर या कारवाईची माहिती देण्यासाठी विविध शिष्टमंडळे परदेशात गेली होती. ही शिष्टमंडळे परत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी संध्याकाळी आपल्या निवासस्थानी शिष्टमंडळांच्या सदस्यांचे स्वागत केले. या शिष्टमंडळांच्या सदस्यांनी पंतप्रधानांना विविध देशांमधील त्यांच्या बैठका आणि अनुभवांची माहिती दिली.

खासदार आणि अधिकाऱ्यांचा समावेश..

या शिष्टमंडळांमध्ये विविध पक्षांचे खासदार, माजी खासदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश होता. परदेश दौऱ्यांदरम्यान या शिष्टमंडळांनी दहशतवादाविरुद्ध भारताची ठाम भूमिका आणि जागतिक शांततेसाठी भारताचे प्रयत्न अधोरेखित केले. यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील आपली भूमिका मजबूत झाली, त्याचप्रमाणे दहशतवादाविरोधात नेहमीच भारत पुढाकार घेईल असेही जगाला ठणकावून सांगितले. या भूमिकेला सर्वत्र जोरदार पाठिंबाही मिळाला.

पाकचा पर्दाफाश करण्याचे काम..

विविध देशांमध्ये गेलेल्या शिष्टमंडळांना दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानचा पर्दाफाश करण्याचे काम देण्यात आले होते. शिष्टमंडळाचे नेतृत्व करणाऱ्या सात खासदारांमध्ये काँग्रेसचे शशी थरूर, भाजपचे रवीशंकर प्रसाद, जेडीयूचे संजय कुमार झा, भाजपचे बैजयंत पांडा, द्रमुकच्या कनिमोझी करुणानिधी, राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेनेचे डॉ. श्रीकांत शिंदे यांचा समावेश होता.

भारताने खंबीर भूमिका जगासमोर...

'ऑपरेशन सिंदूर' नंतर दहशतवादाबाबत भारताची भूमिका जगासमोर मांडण्यासाठी ही शिष्टमंडळे वेगवेगळ्या देशांमध्ये पाठवण्यात आली होती. या शिष्टमंडळाद्वारे भारताने दहशतवादाबाबत आपल्या धोरणाची माहिती दिली.

'ऑपरेशन सिंदूर' कशासाठी?

दि. २२ एप्रिलरोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगामच्या बैसरन खोऱ्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले आहे. भारताने 'ऑपरेशन सिंदूर' द्वारे पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे अनेक अड्डे उद्धवस्त केले. या कारवाईत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील १५० हून अधिक दहशतवादी मारले गेले होते.

थरूर, ओवैसी, श्रीकांत शिंदे यांचे आकर्षण..

या शिष्टमंडळामध्ये सहभागी असलेले शशी थरूर, असदुद्दीन ओवैसी आणि डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या अनुभवांबद्दल सर्वांमध्ये मोठे आकर्षण होते. त्याचप्रमाणे, सुप्रिया सुळे, गुलाम नबी आझाद, रविशंकर, मनीष तिवारी यांचेही अनुभव रोमांचक ठरले. या सर्व यशस्वी प्रतिनिधींचे मोदी यांनी आभार मानले असून भारताच्या ऐक्याचा जगापुढे मोठा पगडा पडला असल्याचे त्यांनी कबूल केले. विरोधक असले तरी देश म्हणून सर्वजण एक आहोत, हा संदेश यानिमित्ताने जगाला पोहोचला, हे महत्त्वाचे आहे.

समाजाच्या जडणघडणीत आपण भरकटलो!

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची खंत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'भारताने स्वातंत्र्यानंतर मोठी प्रगती केली असली, तरी महात्मा गांधी यांना अपेक्षित समाजरचनेच्या मार्गावर देशाने वाटचाल केलेली नसून, आपण समाजाच्या जडणघडणीत भरकटलो आहोत,' अशी खंत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी मंगळवारी व्यक्त केली. 'राज्यघटनाच एकमेव धर्म समजून भारतीयांसाठी पोषक वातावरण निर्माण केल्यास देशाची झपाट्याने प्रगती होईल,' असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

साने गुरुजी यांच्या ७५ व्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्र सेवा दलातर्फे डॉ. काकोडकर यांच्या हस्ते ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते डॉ. कुमार सप्तर्षी, ज्येष्ठ लेखक डॉ. रावसाहेब कसबे, इस्लाम व सुफी तत्त्वज्ञानाचे अभ्यासक प्रा. डॉ. अलीम वकील, सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, 'ऑल इंडिया ओबीसी मुस्लिम महासंघा'चे अध्यक्ष शब्बीर अन्सारी, कार्यकर्त्या पौर्णिमा मेहेर यांना साने गुरुजी जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, राजा कांदळकर आदी उपस्थित होते. समाजातील तळागाळातील व्यक्तींच्या गरजांची पूर्तता करणे, हा खरा आर्थिक विकास असून, तो साध्य करता आला पाहिजे. प्रगतीसाठी कोणत्या मार्गाने पुढे गेले पाहिजे, याबाबत संभ्रम दिसून येतो. त्यामुळे केवळ विचारधारा म्हणजे विकास नव्हे. प्रत्येकांचे वेगवेगळे विचार असू शकतात आणि हेच प्रगल्भ समाजाचे लक्षण आहे,' असे मतही डॉ. काकोडकर यांनी नोंदवले.व्यक्तीच्या संवेदना जागृत असल्याशिवाय तो समाजवादी होत नाही. त्यामुळे मी समाजवादी चळवळीतून वयाच्या ८० व्या वर्षी निवृत्त व्हायचे ठरविले. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे मी लढायचे ठरविले आहे,' असे डॉ. कुमार सप्तर्षी यांनी सांगितले.'सध्याची राजकीय परिस्थिती पाहिली, तर कोट्यवधी रुपये देऊन आमदारांची खरेदी करून सरकार पाडले जाते. त्यावर मुख्यमंत्री स्वतःची पाठ थोपटून घेतात, तेव्हा बधीरता दिसते. समाजात ध्येयवादी विचारांची पोकळी जाणवते. सर्वसामान्य, गरिबांचे जीवनमान आणखी ढासळत चालले असून, नीतीमत्तेचा चुराडा झाला आहे,' अशा शब्दांत डॉ. बाबा आढाव यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली.साने गुरुजी यांच्या ७५ व्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्र सेवा दलातर्फे डॉ. काकोडकर यांच्या हस्ते ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते डॉ. कुमार सप्तर्षी, ज्येष्ठ लेखक डॉ. रावसाहेब कसबे, इस्लाम व सुफी तत्त्वज्ञानाचे अभ्यासक प्रा. डॉ. अलीम वकील, सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, 'ऑल इंडिया ओबीसी मुस्लिम महासंघा'चे अध्यक्ष शब्बीर अन्सारी, कार्यकर्त्या पौर्णिमा मेहेर यांना साने गुरुजी जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

'ध्येयवादी विचारांची पोकळी'

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, राजा कांदळकर आदी उपस्थित होते.समाजातील तळागाळातील व्यक्तींच्या गरजांची पूर्तता करणे, हा खरा आर्थिक विकास असून, तो साध्य करता आला पाहिजे. प्रगतीसाठी कोणत्या मार्गाने पुढे गेले पाहिजे, याबाबत संभ्रम दिसून येतो. त्यामुळे केवळ विचारधारा म्हणजे विकास नव्हे. प्रत्येकांचे वेगवेगळे विचार असू शकतात आणि हेच प्रगल्भ समाजाचे लक्षण आहे,' असे मतही डॉ. काकोडकर यांनी नोंदवले.व्यक्तीच्या संवेदना जागृत असल्याशिवाय तो समाजवादी होत नाही. त्यामुळे मी समाजवादी चळवळीतून वयाच्या ८० व्या वर्षी निवृत्त व्हायचे ठरविले.

बेरजेच्या राजकारणासाठी महायुतीबरोबर

विरोधी पक्षात बसून, आंदोलने, मोर्चे काढून चालत नाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'सत्ता हातात असेल, तरच प्रश्न सुटतात. विरोधी पक्षात बसून, आंदोलने, मोर्चे काढून चालत नाही. आम्ही साधुसंत नाही. लोकांचे प्रश्न सुटले पाहिजेत आणि बेरजेचे राजकारण करण्यासाठी भाजपबरोबर, महायुतीबरोबर जायचे ठरवले,' असे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी येथे स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा २६ वा वर्धापनदिन बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे झाला. त्या वेळी पवार बोलत होते. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खासदार सुनेत्रा पवार, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, हसन मुश्रीफ, राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्ष आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, मंत्री नरहरी झिरवाळ, पुणे शहराचे पूर्व विभागाचे अध्यक्ष सुनील टिंगरे, पश्चिम विभागाचे अध्यक्ष सुभाष जगताप, कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख आदी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, 'लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी हातात सत्ता असणे अत्यंत गरजेचे आहे. समाजातील शोषित, वंचित, मागासवर्गीय, अल्पसंख्याक समाजाला न्याय देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच पुढे राहिला आहे. नागरिकांचे प्रश्न सोडवण्याचे ध्येय हे पक्षाचे आहे. ध्येय सिद्ध करण्यासाठी सत्ता गरजेची आहे. विरोधी पक्षात बसून मोर्चे, आंदोलने करून कोणतेही प्रश्न सुटत नाहीत. नागरिकांना न्याय देता येत नाही. त्यामुळे लोकांच्या हिताचे काम करण्यासाठी काही निर्णय हे घ्यावे लागतात. म्हणूनच पक्षाने केंद्रात आणि राज्यात सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाला पाठिंबा देऊन त्यांच्याबरोबर जाण्याचा निर्णय घेतला.'राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर राज्यात कोणत्याही पक्षाची एकहाती सत्ता आली नाही. राष्ट्रवादीला कधीही स्पष्ट बहुमत मिळाले नाही. प्रत्येक वेळी कोणाची तरी मदत घ्यावीच लागली. महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये असताना शिवसेनेला पाठिंबा दिला आणि सत्तेत आलो. मग लोकांचे प्रश्न सुटावेत आणि राज्याचा सर्वांगीण विकासासाठी भाजपला पाठिंबा दिला तर बिघडले कुठे,' असा सवाल पवार यांनी केला. 'केंद्रात सत्ताधारी म्हणून काम करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक निर्णय रोखठोक घेतले. केंद्रात काँग्रेस आघाडीची सत्ता असताना जातीय जनगणनेची केवळ चर्चा होत होती. मात्र, त्यावर काही निर्णय झाला नाही. मात्र, मोदी सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. असे त्यांनी सांगितले.राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा २६ वा वर्धापनदिन बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे झाला.

अजित पवार यांचे स्पष्टीकरण

त्या वेळी पवार बोलत होते.खासदार सुनेत्रा पवार, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, हसन मुश्रीफ, राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्ष आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, मंत्री नरहरी झिरवाळ, पुणे शहराचे पूर्व विभागाचे अध्यक्ष सुनील टिंगरे, पश्चिम विभागाचे अध्यक्ष सुभाष जगताप, कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख आदी उपस्थित होते.

“ग्रीन म्युनिसीपल बॉन्ड” उभारणारी

पिंपरी-चिंचवड महापालिका ठरली देशात पहिली!

मुंबई शेअर बाजारात ग्रीन म्युनिसिपल बॉंडचे लिस्टींग

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड: “ग्रीन म्युनिसीपल बॉन्ड”च्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात ग्रीन इन्फ्रास्ट्रक्चर तयार होण्यास मदत होणार आहे. 7.57 टक्के व्याजदाराने सदर बॉंड मिळले आहेत. देशातील पहिली महापालिका ठरल्यामुळे केंद्र सरकारचा 20 कोटी रुपयांचा प्रोत्साहन निधी मिळणार आहे. त्यासाठीचा पहिला प्रयत्न पिंपरी-चिंचवड महापालिकेने यशस्वी केला आहे, असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड महानरपालिकेच्या वतीने शहरात हरित सेतू व पर्यावरणपूरक विकास प्रकल्प राबवण्यासाठी आर्थिक स्त्रोत निर्माण करुन हरित कर्ज रोख्यांतून (ग्रीन बॉंड) सुमारे 200 कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेंशन हॉल, मुंबई येथे ग्रीन म्युनिसीपल बॉंड लिस्टींग उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, विधान परिषद आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, सुंदर रमण राममूर्ती, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव डॉ. के. गोविंदराज, ॲड. गोरक्ष लोखंडे, आयुक्त शेखर सिंह, प्रवीण जैन आदी उपस्थित होते.

हरित सेतू प्रकल्प

हरित कर्ज रोख्यातून उभारलेला निधी निगडी प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प आणि गवळीमाथा ते इंद्रायणीनगर चौक दरम्यान टेल्को रस्ता विकास प्रकल्प या दोन महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे. हरित सेतू प्रकल्प पादचारी व सायकल मार्गाने सर्व सार्वजनिक ठिकाणे जोडणारा रस्ते सुरक्षाबाबतचा प्रकल्प आहे. नागरिकांना बस स्टॉप, मेट्रो स्टेशन, शाळा, महाविद्यालय, बँक, कार्यालय, बागा, धार्मिक स्थळे या ठिकाणी पायी व सायकलवर जाणे सुलभ करण्यासाठी उपयुक्त प्रकल्प आहे. वाहनांचा वापर कमी होउन इंधन बचत, वायू व ध्वनी प्रदूषणात घट, आरोग्यदायी वातावरणासाठी पायलट प्रकल्प यशस्वी ठरल्यानंतर संपूर्ण शहरात हा प्रकल्प राबवण्याचे नियोजन आहे.

आयुक्त शेखर सिंह यांचे कौतूक...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि सर्व प्रशासनाचे कौतूक केले. औद्योगिक क्षेत्राने आणि शेअरधारकांनी ‘ग्रीन म्युनिसिपल बॉंड’ला उत्तम प्रतिसाद दिला आहे. बॉंड लिस्टिंग झाल्यानंतर पहिल्या काही मिनिटांतच 100 कोटीहून अधिक सबस्क्रिप्शन झाले आहे. सदर बॉंडवर गुंतवणुकदारांचा विश्वास दिसत आहे. सुंदर रमण राममूर्ती यांनी बॉंड लिस्टिंगसाठी मंच तयार केला. बँकर्स, ऑडिटर्स, रेटिंगसाठी मेहनत घेणाऱ्या सर्व संस्थांचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतूक केले.

हरित कर्जरोख्यातून उभारला 200 कोटींचा निधी

हरित कर्ज रोखे (ग्रीन बॉंड) इश्यू करणारी पिंपरी-चिंचवड महापालिका देशातील पाहिली ठरली आहे. हरित कर्ज रोख्यातून महापालिकेने 200 कोटी रुपयांचा निधी उभारला आहे. गुंतवणुकदारांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेवर असलेला विश्वास अधोरेखित करत, इश्यू सुरू होताच केवळ एका मिनिटांत 100 कोटी रुपयांचा मूळ भाग भरला गेला, तर एकूण 513 कोटी रुपयांच्या निविदा प्राप्त झाल्या, म्हणजेच रोख्याला 5.13 पट अधिक मागणी मिळाली आहे. हरित कर्ज रोखा इश्यूला क्रिसिल आणि केअर या मान्यताप्राप्त पतमापन संस्थांकडून AA+ दर्जा मिळाला आहे. या रोख्यांचा कालावधी पाच वर्षांचा असून, त्यासाठी 7.85 टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित केला आहे.

> “पिंपरी-चिंचवडमधील तमाम नागरिकांसाठी आजचा दिवस अभिमानाचा आहे. “ग्रीन म्युनिसीपल बॉंन्ड” यशस्वी लिस्टींग करणारी देशातील पहिली महापालिका पिंपरी-चिंचवड ठरली आहे. त्याला गुंतवणुकदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. शहरातील ग्रीन इन्फ्रास्ट्रक्चरसाठी सदर हरित कर्जरोखे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. “ग्रीन म्युनिसीपल बॉंन्ड”मुळे शहराच्या प्रगतीशील वाटचालीस बळ मिळेल. केंद्र सरकारकडून 20 कोटी रुपयांचे प्रोत्साहन अनुदान मिळाले. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महापालिका प्रशासनाचे मना:पासून आभार व्यक्त करतो.
>
> **-महेश लांडगे,** आमदार

विजेचा लपंडाव; आकुर्डीतील नागरिक वैतागले

महावितरणच्या अधिकाऱ्यांसमोर वाचला समस्यांचा पाढा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आकुर्डी गावठाण, पंचतारानगर, गुरुदेवनगर, पांढरकर वस्ती परिसरात वारंवार लाईट जाण्याचे प्रमाण वाढले आहे. दररोज लाईट जाने हा नित्यनियम झाला आहे, त्यामुळे तेथील स्थानिक नागरिक या विजेच्या लपंडावाला वैतागले आहेत.



विजेचा सातत्याने होणारा लपंडाव, व गैरसोईला कंटाळलेल्या आकुर्डी परिसरातील नागरिकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसमोर समस्यांचा पाढा वाचला. तेथील अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या लवकरात लवकर दूर करू असे आश्वासन दिले. याबाबत माजी नगरसेविका शर्मिला बाबर म्हणाल्या आकुर्डी गावठाण, पंचतारानगर, गुरुदेवनगर, पांढरकर या परिसरात भविष्यात नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणे आवश्यक आहे. तो ट्रान्सफॉर्मर डीपीडीसीच्या माध्यमातून बसवून देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले. तसेच यावेळी सचिन पांढरकर, रामभाऊ पांढरकर, पंढरीनाथ थरकुडे, रामभाऊ दातीर पाटील, तुकाराम बागल, चतुर पांढरकर, अजय भालेराव, मोहन यादव, गिरीश कुलकर्णी, रोशन शिर्के आदी उपस्थित होते.

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



आपला व्यवहार, परमार्थ, घडतो। तो सर्व त्याचे इच्छेने चालतो॥

'असे झाले असते तर बरे झाले असते' । हे म्हणणे नाही खरे ॥ जे होणे योग्य ते घडले । व ते रामइच्छेनेच घडले ॥ परमात्म्यानेच जी इच्छा केली । त्याचे आड नाही कोणी आले । हा ठेविता विश्वास । मनाला धीर वाटेल खास ॥ माझे सर्व कर्माचा गुरूच सूत्रधार । सर्व सत्ता गुरूचे हाती । तेथे न चाले कोणाची गति ॥ आपले जगणे जेथे भगवंताच्या हाती । तेथे बाकीच्या गोष्टींची काय मिति ? ॥ परिस्थिति कोणाचीही । कितीही असली भली किंवा बुरी । तरी परमात्म्याचेच हाती त्याची दोरी ॥

न पडावे अभिमानाला बळी । रामइच्छा जाणावी सगळी ॥ हा जरी असेल सिद्धांत । तरी जपून वागावे व्यवहारात ॥ आपला व्यवहार, परमार्थ घडतो । तो सर्व त्याचे इच्छेने चालतो ॥ म्हणून होणे जाणे भगवंताच्या हाती । आपण त्याला जावे शरणागति ॥

चित्तांत ज्याच्या राहिले समाधान । तोच भगवंताचा आवडता जाण ॥ ज्याचा विश्वास रामावरी। त्याला समाधान स्वीकारी ॥ माझे हित रामाचे हाती । हा धरिता विश्वास । समाधान मिळत असे जीवास ॥ आपण होऊन रामाचे जाण । सदा राखावे समाधान ॥ मी-माझे करावे रामार्पण । तेथे समाधानाचा अनुभव पूर्ण ॥

आस ठेवावी रामापायी । आनंदी समाधानी राही ॥ अंतरी समाधान । हेच आपले साधन जाण ॥ संसारात न पहावे उणे पुरे । ठेवावे त्यात समाधान खरे ॥ जशी जशी ज्या वेळी जी परिस्थिति । तशी तशी असावी समाधान वृत्ति ॥ ज्या स्थितीत ठेवील राम । त्यात राखावे समाधान ॥ चिंता, अहंता, ममता, कोणी कारणावाचून । केले छळ, कपट, अपमान । अथवा बोलिले शब्दबाण । त्यात राखावे समाधान ॥ समाधान देणे नाही दुसऱ्याच्या हाती । ईश्वरकृपेनेच त्याची प्राप्ति ॥

जोवर संशयी झाले मन । तोवर न होई समाधान ॥ विषयास घातले खत जाण । तरी कसे पावावे समाधान ? ॥ जोवर दृश्याचे भान । तोवर मनी न राहे समाधान ॥ समाधानाची स्थिति । उपाधिरहित असावी वृत्ति ॥ कोठे ठेवावे मन । जेणे मिळेल समाधान ? ॥ समाधान नव्हे देहाचा गुण । मनाने व्हावे भगवंताचे आपण ॥ पांडव झाले वनवासी । पण अखंड राहिले भगवंतापाशी॥ पांडव भगवंताचे भक्त झाले । वनवास नाही चुकविता आले । त्यांनी केले भगवंताचे स्मरण। जेणे राखिले समाधान ॥ 'आता झालो मी रामाचा' । हा विचार ठेवावा साचा ॥ ऐसे होऊन राही । समाधान तेथेच पाही॥

बोधवचन:- सर्व कर्ता राम। हे ठेविता चित्ती। समाधान येते त्यापरती॥

'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

मुंबईतील चाकरमान्यांची रोजची धावपळ..त्यांना घेऊन जाणाऱ्या लोकल आणि स्थानिक बसेस किंवा प्रसंगी टॅक्सी पाहिल्या, तर तेथील जीवनमान सुरळीत आहे असे कसे काय म्हटले जाते ? क्षणाक्षणाला अपघाताची भीती, काय वाटेल ते घडेल, ही घबराट.. प्रत्येकालाच भेडसावत असणार ! घराबाहेर पडलेली व्यक्ती 'जिवंत' परत येईल, याची खात्री खरे कोणीही देऊ शकणार नाही अशी तेथील 'लाईफ स्टाईल' !

मुंबईची 'लाईफलाईन', ठरत आहे 'डेथलाईन' !

लोकलबाहेर लटकणाऱ्यांवर घाला..

पण दोन दिवसांपूर्वी, मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ लोकलबाहेर लटकणारे १३ ते १४ प्रवासी खाली कोसळून त्यातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाल्याचा वेदनादायक प्रकार घडला.. आणि मग मुंबईची ही लाईफलाईन आता डेथलाईन तर बनत नाही ना, असे म्हणण्याची वेळ आली!

खचाखच गर्दी आणि मरणाची धावपळ..

तसे पाहिले तर, सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस. मुंबईतील उपनगरी रेल्वेगाड्या तुडुंब गर्दीला घेऊन धावत असतात. मुंब्रा स्थानकाजवळ दोन लोकल गाड्यांतील दरवाजात उभे असलेले प्रवासी एकमेकांना घासले गेले, त्यातूनच काही जण खाली पडले आणि ही दुर्घटना घडली. मुंबईच्या लोकल मधून रोज ७५ लाखांहून अधिकजण प्रवास करतात. एवढ्या संख्येने प्रवाशांना घेऊन धावणारी क्षमता जगात कुठेही नसावी. रात्रीचे चार तास सोडले तर सीएसटी-चर्चगेटपासून या लोकल्स शेवटच्या टोकापर्यंत धावत असतात.

मुंबईची जीवनवाहिनी...

मध्य, पश्चिम, हार्बर मार्गावरील उपनगरी सेवा ही तर मुंबईची जीवनवाहिनी आहे. आता मेट्रो, मोनो मुंबईकरांची अत्यावश्यक सेवा बनली आहे. लोकल्स आणि मेट्रो हा मुंबईकरांचा श्वास आहे. मग ही सेवा चोवीस तास तत्पर व कार्यरत ठेवणे हे जसे रेल्वेला आव्हान आहे तर रेल्वेचे कर्तव्यही आहे.

सर्वाधिक उत्पन्न मुंबईतून..

याच महानगरातून देशाला सर्वांत जास्त जीएसटी मिळतोय. त्या बदल्यात रेल्वे मंत्रालय ७५ लाख मुंबईकरांचा रोजचा लोकल प्रवास सुखाचा व्हावा म्हणून काय सेवा सुविधा देते? कोंडवाड्यात जशी जनावरे दावणीला असतात, त्याहीपेक्षा लोकलमधील प्रवाशांची अवस्था वाईट असते. मुंब्रा येथे कसाराहून सीएसटीकडे जाणारी आणि सीएसटीहून कसाराकडे जाणारी लोकल दरम्यान ही दुर्घटना झाली आहे. दरवाजात उभे राहून लटकून प्रवास करणारे एकमेकांना घासले गेले व त्यातले डझनभर खाली पडले असे सांगण्यात आले.

अपघाताचा असा प्रकार गंभीर..

धावत्या लोकलमध्ये प्रवाशांना स्वतःचा तोलही सांभाळता आला नाही, जे खाली पडले त्यांना धरून किंवा खेचून पुन्हा डब्यात आणणे इतरांना शक्य झाले नाही. या अपघातात कुणी किती जखमी झाले, कोणाचे हात-पाय मोडले, कुणाला जीव गमवावा लागला याचा तपशील नंतर येईलच, पण गर्दीने भरलेल्या लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडले ही बाब अतिशय गंभीर आहे. ही वेळ त्यांच्यावर का आली, त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर कोणी देणार नाही.

लोकल प्रवासी वाऱ्यावर...

देशात जिकडे तिकडे वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होत आहे. वंदे भारत ट्रेनची क्रेझ वाढत आहे. पण मुंबईतील लोकल्समधून रोज प्रवास करणारे लाखो प्रवासी मात्र वाऱ्यावर सोडले आहेत, रोज पोटापाण्यासाठी व रोजगारासाठी लक्षावधी मुंबईकर गर्दीने भरलेल्या लोकल्समधून दोन-अडीच तास प्रवास करीत कामावर पोहोचत असतात आणि त्याच गर्दीतून सायंकाळी-रात्री घरी परतत आहेत. गर्दीचे दुष्टचक्र संपणार कधी? लोकल प्रवाशांना दिलासा कधी? लोकलमधून मुंबईकरांना कधी सुखाने प्रवास करायला मिळणार?

धोकादायक प्रवासाची मुळीच हौस नाही..

सर्वसामान्य लोक कोणीही हौस म्हणून लोकलने प्रवास करीत नाहीत. स्वस्तात व जलद प्रवास करता येतो म्हणून लाखो लोक लोकल्स प्रवासाकडे आकर्षित होतात. गेल्या दोन वर्षांत एअर कंडिशन्ड लोकल्स धावू लागल्या आहेत. जशी त्यांची संख्या वाढत आहे तसे विना एसी लोकल्स कमी होत आहेत, मुंबईत एसी लोकल्स हव्या आहेत, त्याला मागणीही बरीच आहे. एसी लोकल्समधून प्रवास करणारा वर्गही मोठ्या संख्येने आहे. पण, सर्वसाधारण लोकल परवडते म्हणून त्या लोकलने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांवर अन्याय होता कामा नये,याची दक्षता रेल्वे प्रशासनाने घेतली पाहिजे.

बाप रे किती मृत्युमुखी?

अपघातांच्या या मालिकेच्या थोडे खोलात शिरले तर गेल्या वीस वर्षांत मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात ५१ हजार ८०२ लोकांचा मृत्यू झाला. मुंबईत रेल्वे अपघातात रोज सात ते आठ लोक मरण पावतात. पण, त्याची कुठे बातमीही प्रसिद्ध होत नाही. 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी मुंबईच्या उपनगरी रेल्वेची अवस्था झाली आहे. सन २०२५ या नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मुंबईत रेल्वे अपघातात ६६३ लोक ठार झाले. त्यातले २७२ जण लोकलमधून खाली पडून मरण पावले, तर ३९१ जण रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. किती भयानक ही आकडेवारी आहे? याची साधी चर्चा पण होत नाही.

लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण?

मुंबईतील लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? प्रत्येक ट्रेनमध्ये प्रत्येक लोकलच्या डब्यात विनातिकीट अनेक प्रवासी असतात. प्रथम श्रेणीच्या डब्यातही विनातिकीट लोकांची अगदी महिलांचीही बरीच गर्दी असते. आपल्याला तिकीट कोणी विचारायला येणार नाही याची त्यांना खात्री असते. विनातिकीट प्रवासी हे दैनंदिन पासधारकांना रोजची डोकेदुखी असते. पण, धावत्या लोकलमध्ये डब्यात येऊन तिकीट तपासणी जवळपास बंदच झाली आहे. मध्य व पश्चिम रेल्वेचे टीसी जातात कुठे? हा पासधारकांना रोज प्रश्न पडलेला असतो. भिकारी, फेरीवाले, विक्रेते, डब्यात गलिच्छ फडकी मारून सफाई केल्याचा आव आणणाऱ्यांची गर्दी भरपूर असते. हातात तान्हे बाळ घेऊन भीक मागणाऱ्याऱ्यांची संख्याही बरीच आहे. हे सारे लोक स्टेशनात तरी कसे येतात? लोकलमध्ये कसे चढू शकतात? यांना रोखणारी, हटवणारी, व कारवाई करणारी यंत्रणा असते का नाही?

गर्दीत चोरांचा सुळसुळाट

लोकलधील खचाखच गर्दीमध्ये पाकीटमार व मोबाईल चोरांच्याही टोळ्या सावज शोधत असतात. पण, रेल्वे पोलिसांचा त्यांना धाक आहे असे कुठे दिसत नाही. मुंब्रा येथे गर्दीत तोल न सावरता आल्यामुळे डझनभर प्रवासी खाली पडले, ही गर्दी नियंत्रित होणार नसेल तर पुढेही असे अपघात होत राहतील. मुंबईची जीवनवाहिनी सुरक्षित राहिली पाहिजे,याची जबाबदारी रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिसांची आहे, हे त्यांना तरी माहीत आहे का?

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मी खिशात पैसे घेऊन बसतो काय?

अजित पवारांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना अप्रत्यक्ष सुनावलं

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा (अजित पवार) आज २६ वा वर्धापन दिन पुण्यात साजरा झाला. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना अजित पवार यांनी राज्यातील राजकारणासह विविध विषयांवर भाष्य केलं. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भारतीय जनता पक्षाबरोबर म्हणजे महायुतीबरोबर जाण्याचा निर्णय कधी व का घेतला? याबाबत देखील अजित पवार यांनी स्पष्टीकरण दिलं.

तसेच याच कार्यक्रमात बोलताना अजित पवार यांनी शिवसेना शिंदेंच्या काही नेत्यांना देखील अप्रत्यक्ष सुनावल्याचं पाहायला मिळालं. सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विभागाचा निधी वळवल्याचा आरोप काही नेत्यांनी केला होता. त्यावर आज अजित पवार यांनी उत्तर देत थेट नाव न घेता मी खिशात पैसे घेऊन बसतो काय? असं म्हणत शिवसेनेच्या मंत्र्यांना अप्रत्यक्ष सुनावलं आहे.कधी कधी काही बातम्या येतात की अजित पवार पैसे सोडत नाहीत. पैसे सोडत नाही, मग मी काय खिशात पैसे घेऊन बसतोय का? शेवटी राज्य सरकारने अर्थसंकल्प सादर केल्यानंतर पहिल्या तीन महिन्यांत आम्ही २० टक्के पैसे सोडतो, दुसऱ्या तीन महिन्यांत ४० टक्के सोडतो. तिसऱ्या तीन महिन्यांत ६० टक्के सोडतो, नंतर ८० टक्के आणि शेवटी १०० टक्के सोडतो. अशा प्रकारचं ते नियोजन असतं.मागच्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमातीच्या आयोगाला वैधानिक दर्जा देण्याचं काम आम्ही केलं. तेव्हाच हे लक्षात आलं की अशाच पद्धतीने अनुसूचित जातीलाही दिलं पाहिजे. कारण आयोग होता पण वैधानिक दर्जा नव्हता. त्यानंतर आज राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्याचा निर्णय घेतला", असं अजित पवार यांनी म्हटलं. समाजकल्याण विभागाचा निधी वळवल्याचा आरोप करण्यात येतो. मात्र, मागील वर्षीच्या तुलनेत त्या विभागाला जास्त निधी दिला आहे. काही जण मुद्दामहून आपलं सरकार आल्यापासून आपली बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहेत. काही जणांनी विधानं केले की सामाजिक न्याय विभागावर अन्याय केला. आता या ठिकाणी नरहळी झिरवाळ आहेत. तसेच सर्वांना माहिती आहे की या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करत असताना आदिवासी विभागाला आपण निधी वाढवून ४१ टक्के दिला आहे. पण ही माहिती सर्वांसमोर येत नाही", असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे. शरद पवार आणि इतर काही मान्यवरांनी एकत्र येत राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली. तेव्हापासून आजपर्यंत पक्षाने कधीही मागे वळून पाहिलं नाही. आपल्याला नेहमीच सत्तेत सहभागी व्हावं लागलं. कारण आधीपासूनच राजकारणाची अशी परिस्थिती निर्माण झाली की एका पक्षाची सत्ता येण्याचे दिवस संपले आहेत. कारण केंद्रात देखील कुणाला यूपीए किंवा कोणाला एनडीए अशी आघाडी आणि युती करावी लागल्याची परिस्थिती देशाने पाहिली आहे. पण सर्वांनी साथ दिल्यामुळे आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष २६ वा वर्धापन दिन साजरा करत आहे.

पक्षाने कधीही मागे वळून पाहिलं नाही

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा पक्ष आहे. आता काही जण मला विचारतात की तुम्ही भाजपाबरोबर का गेला आहात? मी तुम्हाला सांगतो की, २०१९ साली आपल्या पक्षाने शिवसेना पक्षाबरोबर सरकार स्थापन केलं होतं. तेव्हा देखील आपण सत्तेसाठी काही तडजोडी केल्या होत्या. कारण शेवटी विरोधी पक्षात बसून आणि घोषणा देऊन चालत नाही. आपण साधू संत नाहीत. आपण लोकांचे प्रश्न सोडवणारे आणि बेरजेचं राजकारण करणारे लोक आहोत. त्यामधून आपण भाजपा आणि एनडीएबरोबर जाण्याचा निर्णय घेतला", असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.शरद पवार आणि इतर काही मान्यवरांनी एकत्र येत राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली. तेव्हापासून आजपर्यंत पक्षाने कधीही मागे वळून पाहिलं नाही.

छगन भुजबळ पुन्हा नाराज?

राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनाला गैरहजर राहिल्याने चर्चा

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा (अजित पवार) आज २६ वा वर्धापन दिन पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह त्यांच्या पक्षाचे अनेक नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना अजित पवार यांनी राजकारणासह विविध विषयांवर भाष्य केलं. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भारतीय जनता पक्षाबरोबर म्हणजे महायुतीबरोबर जाण्याचा निर्णय कधी व का घेतला?

याबाबत देखील अजित पवार यांनी भाष्य केलं. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला मंत्री छगन भुजबळ हे अनुपस्थित असल्याचं पाहायला मिळालं.मंत्री छगन भुजबळ हे अनुपस्थित असल्याने ते पुन्हा नाराज आहेत का? असा सवाल राजकीय वर्तुळातून उपस्थित करण्यात आला. काही दिवसांपूर्वीच छगन भुजबळ यांची मंत्रिपदी वर्णी लागली. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतर छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आलं होतं. त्यामुळे भुजबळांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. एवढंच नाही तर त्यांनी अजित पवार यांच्यावरही टीका केली होती. मात्र, त्यानंतर नुकतंच काही दिवसांपूर्वी छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. मंत्रिपदी वर्णी लागल्यानंतरही छगन भुजबळ हे पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात दिसले नाहीत. दरम्यान, राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात छगन भुजबळ उपस्थित नसल्यामुळे पुन्हा वेगवेगळ्या चर्चा रंगू शकतात. याचा अंदाज घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छगन भुजबळ हे कार्यक्रमाला का उपस्थित राहिले नाहीत? याचं कारण भर कार्यक्रमात बोलताना सांगितलं. या कार्यक्रमाला छगन भुजबळ हेच नाही तर आणखी जे नेते उपस्थित नव्हते, त्यांच्याबाबतही अजित पवार यांनी स्पष्टीकरण दिलं.

छगन भुजबळ उपस्थित नव्हते

दत्तात्रय भरणे, दिलीप वळसे पाटील आणि छगन भुजबळ हे वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला का उपस्थित राहू शकले नाहीत? याबाबत अजित पवार यांनी स्पष्टीकरण दिलं.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा (अजित पवार) आज २६ वा वर्धापन दिन पुण्यात होत असला तरी राज्याच्या इतरही काही भागात आपला वर्धापन दिनाचा कार्यक्रम साजरा होत आहे. त्यामुळे मला समाधान आहे. मात्र, आजच्या या कार्यक्रमाला आपले काही कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेते काही कारणास्तव उपस्थित राहू शकले नाहीत. छगन भुजबळ यांचा आधीच विदेश दौरा ठरलेला होता. दत्तात्रय भरणे यांचाही ३० दिवसांपूर्वी विदेश दौरा ठरलेला होता. दिलीप वळसे पाटील यांची तब्येत बरी नाही. त्यामुळे आजच्या आपल्या पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला हे तीनही प्रमुख नेते उपस्थित राहू शकले नाहीत.

व्हिसाचा गैरवापर सहन केला जाणार नाही

विद्यार्थ्याचा फोटो व्हायरल झाल्यानंतर अमेरिकेने काय म्हटलं?

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्यांच्या निर्णयांची जगभरात चर्चा सुरु आहे. बेकायदेशीर स्थलांतरिताच्या मुद्द्याची देखील प्रामुख्याने मोठी चर्चा झाल्याचंही पाहायला मिळालं. असं असतानाच अमेरिकेत एका भारतीय विद्यार्थ्याला नेवार्क विमानतळावर अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली.

विद्यार्थिला विमानतळावरील अधिकाऱ्यांनी मारहाण करत बेड्या घालत जमिनीवर ढकलल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे संतापाची लाट उसळली आहे. अमेरिकेतील नेवार्क विमानतळावरून भारतीय विद्यार्थ्याला हातकड्या घालून परत पाठवण्यात आल्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. या घटनेनंतर भारतातील अमेरिकन दूतावासाची प्रतिक्रिया समोर आली आहे.भारतातील अमेरिकन दूतावासाने म्हटलं आहे की, 'अमेरिका कायदेशीर पर्यटकांचं स्वागत करेल. मात्र, बेकायदेशीर प्रवेश, व्हिसाचा गैरवापर किंवा अमेरिकन कायद्याचं उल्लंघन सहन करणार नाही. कायद्याचं उल्लंघन करत अमेरिकेत प्रवास करण्याचा कोणताही अधिकार नाही', असं दूतावासाने म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत अमेरिकेतील भारतीय दूतावास अमेरिकन अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात आहे. परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकन विमानतळावर आणि भारतातील अमेरिकन दूतावासात भारतीय विद्यार्थ्याला ताब्यात घेतल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. संपूर्ण घटनेची माहिती भारताला अद्याप मिळालेली नाही. त्या भारतीय विद्यार्थ्याला कोणत्या आधारावर ताब्यात घेण्यात आलं? भारतीय तरुणाचे अंतिम ठिकाण कोणतं होतं? याबाबत पररानेवार्क विमानतळ अमेरिकन अधिकाऱ्यांनी एका भारतीय विद्यार्थ्याला हातकडी लावल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ संबंधित विद्यार्थी रडत होता. मात्र, तरीही त्याला गुन्हेगार असल्यासारखं वागवलं गेलं. त्या विद्यार्थ्याला अमेरिकेतून भारतात परत पाठवलं जात असल्याचं म्हटलं.ष्ट्र मंत्रालय लक्ष ठेवून आहे.दरम्यान, या घटनेबाबत भारतीय अधिकाऱ्यांनी म्हटलं की,"आम्हाला सोशल मीडियावर अशा पोस्ट आढळल्या आहेत. ज्यात दावा केला जात आहे की एका भारतीय तरुणाला नेवार्क आंतरराष्ट्रीय विमानतळावर अडचणी निर्माण झाली आहे. आम्ही या संदर्भात स्थानिक अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहोत", असं भारतीय एका अधिकाऱ्याने एक्सवर म्हटलं आहे.अमेरिकेतून हद्दपार करण्याच्याआधी त्या विद्यार्थ्याला विमानतळावरील अधिकाऱ्यांनी मारहाण करत बेड्या घालत जमिनीवर ढकलल्याचं सांगितलं जातं.त्यामुळे संतापाची लाट उसळली आहे. अमेरिकेतील नेवार्क विमानतळावरून भारतीय विद्यार्थ्याला हातकड्या घालून परत पाठवण्यात आल्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. या घटनेनंतर भारतातील अमेरिकन दूतावासाची प्रतिक्रिया समोर आली आहे.भारतातील अमेरिकन दूतावासाने म्हटलं आहे की, 'अमेरिका कायदेशीर पर्यटकांचं स्वागत करेल. मात्र, बेकायदेशीर प्रवेश, व्हिसाचा गैरवापर किंवा अमेरिकन कायद्याचं उल्लंघन सहन करणार नाही. कायद्याचं उल्लंघन करत अमेरिकेत प्रवास करण्याचा कोणताही अधिकार नाही', असं दूतावासाने म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.दरम्यान, या प्रकरणाबाबत अमेरिकेतील भारतीय दूतावास अमेरिकन अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात आहे.

अंतिम ठिकाण कोणतं होतं?

परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकन विमानतळावर आणि भारतातील अमेरिकन दूतावासात भारतीय विद्यार्थ्याला ताब्यात घेतल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. संपूर्ण घटनेची माहिती भारताला अद्याप मिळालेली नाही. भारतीय तरुणाचे अंतिम ठिकाण कोणतं होतं? याबाबत पररानेवार्क विमानतळ अमेरिकन अधिकाऱ्यांनी एका भारतीय विद्यार्थ्याला हातकडी लावल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ संबंधित विद्यार्थी रडत होता. मात्र, तरीही त्याला गुन्हेगार असल्यासारखं वागवलं गेलं. त्या विद्यार्थ्याला अमेरिकेतून भारतात परत पाठवलं जात असल्याचं म्हटलंष्ट्र मंत्रालय लक्ष ठेवून आहे.

हे लग्न लावल्यास वाईट परिणाम होतील!

राजा रघुवंशी हत्या प्रकरणाची देशभरात मोठी चर्चा

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

राजा रघुवंशी हत्या प्रकरणाची देशभरात मोठी चर्चा सुरु आहे. मध्य प्रदेशच्या इंदोरमधील सोनम आणि तिचा पती राजा रघुवंशी हे २२ मे रोजी शिलाँगमधून अचानक बेपत्ता झाले होते. त्यानंतर २ जून रोजी राजा रघुवंशीचा मृतदेह आढळून आला होता. मात्र, तेव्हापासून सोनम रघुवंशी ही बेपत्ता झाली होती. त्यामुळे मोठी खळबळ उडाली होती. यानंतर ९ जूनला गाझिपूरमध्ये सोनम एका ढाब्यावर आढळून आली आणि पोलिसांनी तिला अटक केलं.

या प्रकरणात आता आणखी चार जणांना अटक करण्यात आलं असून दररोज धक्कादायक खुलासे समोर येत आहेत.राजा रघुवंशीची हत्या प्रकरणात सोनमचा सहभाग असल्याचा दावा पोलिसांकडून केला जात आहे. मुख्य आरोपी असल्याचा संशय पोलिसांना असून त्या अनुषंगाने पोलीस तपास करत आहेत. मात्र, आता राजाचा मोठा भाऊ विपिन रघुवंशी यांनी एक मोठा दावा केला आहे. सोनमचं लग्न राजाशी लावल्यास त्याचे परिणाम चांगले होणार नाहीत, असा इशारा सोनमने तिच्या कुटुंबाला दिला होता असा दावा राजाच्या मोठ्या भावाने केला आहे. तसेच सोनमच्या प्रेमसंबंधाबाबत देखील तिच्या कुटुंबाला माहिती होतं, असाही दावा विपिन रघुवंशी यांनी केला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. वृत्तानुसार, विपिन रघुवंशी यांनी म्हटलं की, "सोनमने तिच्या आईला राज कुशवाहबरोबर असलेल्या तिच्या प्रेम संबंधांबद्दल सांगितलं होतं. पण सोनमच्या कुटुंबाने त्यांचं हे नातं स्वीकारण्यास नकार दिला आणि तिचा विवाह आपल्याच समुदायात झाला पाहिजे असा आग्रह धरला होता", असा आरोप विपिन रघुवंशी यांनी केला आहे. सोनमच्या कुटुंबातील एका व्यक्तीने मला सांगितलं की सोनमने तिच्या आईला सांगितलं होतं की तिचे दुसऱ्या कोणावर तरी प्रेम आहे. पण तिच्या कुटुंबाने तिला सांगितलं होतं की, तू कोणावरही प्रेम करू शकतेस. पण तुझे लग्न आपल्या समाजातच होईल.

आईला दिला होता इशारा

सोनम माझ्या मुलाची हत्या म्हणजेच राजाची हत्या करेल हे आम्हाला कधी स्वप्नातही वाटलं नव्हतं. पण आता ज्या गोष्टी समोर येत आहेत त्यावरुन असंच वाटतं आहे तीच या सगळ्यात सामील आहे. राजाच्या फोटोला हार घालण्यात आला आहे. हा फोटो जवळ घेऊन त्याची आई म्हणाली, सोनमला दुसरा मुलगा आवडत होता तर मग तिने राजाशी लग्न करण्यास नकार का दिला नाही? तिने माझ्या मुलाची हत्या का केली? तर राजाच्या वडिलांनी म्हटलं आहे की ज्यांनी माझ्या मुलाला ठार केलं त्यांना फाशी द्या. माझ्या मुलाला तडफडत ठेवलं आणि मारण्यात आलं आहे. यापुढे अशा घटना होऊ नयेत म्हणून सगळ्या आरोपींना फाशी द्या. अशी मागणी राजाच्या वडिलांनी केली आहे.

कंगना रणौत सोनम रघुवंशीवर संतापल्या

राजा रघुवंशी याची मेघालयात हनिमूनवर असताना हत्या झाली. या हत्या प्रकरणात त्याची पत्नी सोनम रघुवंशी सहभागी आहे. तिनेच बॉयफ्रेंडबरोबर मिळून पतीची हत्या केली, असा धक्कादायक खुलासा झाल्यानंतर देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. भाजपा खासदार व अभिनेत्री कंगना रणौत यांनीही मेघालय हनिमून हत्याकांडाबद्दल सोशल मीडियावर प्रतिक्रिया दिली आहे. कंगना रणौत यांनी राजाची पत्नी सोनम रघुवंशीला 'मूर्ख' म्हटलं आहे. तसेच तिने अत्यंत निर्दयीपणे पतीची हत्या केली असंही म्हटलं आहे. कंगना रणौत यांनी इन्स्टाग्राम स्टोरीजमध्ये लिहिलं, "हे किती भयंकर आहे!! एक महिला नकार देऊ शकत नाही, कारण तिला तिच्या स्वतःच्या आई-वडिलांची भीती वाटते; पण दुसरीकडे ती सुपारी किलर्सबरोबर मिळून अत्यंत निर्दयीपणे खून करायचा कट रचते. सकाळपासून माझ्या डोक्यात हेच फिरतंय!!! उफ्फफफ आता डोकं दुखत आहे!! ती घटस्फोटही घेऊ शकली नाही किंवा तिच्या प्रियकरासोबत पळूनही जाऊ शकली नाही."त्या पुढे म्हणाल्या, "किती क्रूर, घृणास्पद आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे किती मूर्ख आहे ती. मूर्ख लोकांना कधीही हलक्यात घेऊ नये. ते समाजासाठी सर्वात मोठा धोका असतात... आपण अनेकदा त्यांच्यावर हसतो आणि ते हानी पोहोचवणार नाही, असं समजतो पण ते चुकीचं आहे. बुद्धी असलेले लोक स्वतःच्या भल्यासाठी इतरांचे नुकसान करू शकतात, पण लक्षात ठेवा की मूर्ख व्यक्तीला ते काय करत आहेत याची काहीच कल्पना नसते !!!

जिनिलीयाने केली वटपौर्णिमेची पूजा!

जिनिलीया व रितेश देशमुख यांची जोडी सोशल मीडियावर कायम चर्चेत असते. या दोघांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. रितेश-जिनिलीयाचे मजेशीर रील्स व्हिडीओ चाहत्यांमध्ये विशेष लोकप्रिय आहेत. या जोडप्याकडे मनोरंजन विश्वातील आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं. एकमेकांना जवळपास १० वर्षे डेट केल्यावर रितेश-जिनिलीयाने ३ फेब्रुवारी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. या दोघांची पहिली भेट 'तुझे मेरी कसम' सिनेमाच्या सेटवर झाली होती. या जोडप्याला रियान अन् राहील अशी दोन मुलं आहेत. जिनिलीयाने लग्नानंतर सासरी आल्यावर मराठी संस्कृती, परंपरा, रितीरिवाज या सगळ्या गोष्टी मोठ्या आवडीने शिकून घेतल्या, असं स्वत: रितेशने अनेक मुलाखतींमध्ये सांगितलं आहे. याशिवाय अभिनेत्री मराठी सण देखील हौसेने साजरे करते. जिनिलीयाने नुकतीच वटपौर्णिमा साजरी केली. राहत्या घरी वटसावित्रीची पूजा करून तिने रितेशसाठी प्रार्थना केली. याचा व्हिडीओ अभिनेत्रीने सोशल मीडियावर शेअर केला आहे. जिनिलीयाने या पोस्टमध्ये "आय लव्ह यू रितेश" म्हणत पतीला टॅग केलं आहे. जिनिलीयाचा हाच व्हिडीओ रितेशने त्याच्या इन्स्टाग्रावर रिशेअर करत बायकोसाठी खास पोस्ट लिहिली आहे. रितेश लिहितो, "प्रिय बायको...मी खरंच भाग्यवान आहे कारण, तू माझ्या आयुष्यात आहेस...तुझ्यामुळे मी खरंच खूप आनंदी आहे. तू माझा आधार आहेस, शक्ती आहेस अन् माझं संपूर्ण जगं आहेस.

मालविकाने शेअर केलेले खास फोटो

काही चित्रपटातील एखादे पात्र इतके दमदार असते की ते साकारणारा कलाकार नंतर रुपेरी पडद्यावर दिसला नाही तर चाहत्यांच्या लक्षात असतो. गाजलेल्या मराठी चित्रपटात असंच एक पात्र साकारणाऱ्या अभिनेत्रीने ऑक्सफर्डमधून तिचं शिक्षण पूर्ण केलं आहे. तिची ही पोस्ट सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आहे.'मुळशी पॅटर्न' या गाजलेल्या मराठी चित्रपटातील चहावाली तुम्हाला आठवते का? 'मुळशी पॅटर्न'मध्ये अभिनेत्री मालविका गायकवाड हिने चहावालीची भूमिका साकारली होती. हा तिचा पहिला चित्रपट होता, यानंतर ती रुपेरी पडद्यावर झळकली नाही, पण या एकमेव भूमिकेने तिला खूप लोकप्रियता मिळवून दिली.मालविका ही पुण्यातच लहानाची मोठी झाली. पुण्याच्या सिंहगड कॉलेजमधून मालविकाने इंजिनिअरिंगची पदवी मिळवली होती. तिला आवड असल्याने तिने 'मुळशी पॅटर्न'मधील भूमिकेसाठी ऑडिशन दिली होती आणि तिची निवड झाली. मालविका ही बडोद्याच्या गायकवाड राजघराण्याची कन्या आहे.'मुळशी पॅटर्न'नंतर मालविकाने लग्न केलं आणि पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेली. मालविकाने तिच्या इन्स्टाग्राम एक पोस्ट केली आहे, ज्यात तिने आनंदाची बातमी शेअर केली आहे. "ऑक्सफर्डमध्ये "डू फिडेम" म्हटलं – जो "मी शपथ घेते" साठी फॅन्सी लॅटिन शब्द आहे... खरं तर हे "आय ॲम इन!"चे ओरिजनल व्हर्जन आहे. आता मी ऑक्सफर्डची अधिकृत पदवीधर आहे", असं कॅप्शन मालविकाने तिच्या या पोस्टला दिलं आहे

श्रेयाच्या एन्ट्रीनंतर चाहते झाले भावुक

सीआयडी हा लोकप्रिय टीव्ही शो आहे. सीआयडीच्या पहिल्या सीझनला जितका प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला, तितकाच तो दुसऱ्या सीझनलादेखील मिळताना दिसत आहेत. १९९८ साली सीआयडी हा शो सुरू झाला. २०१८ पर्यंत हा कार्यक्रम अविरतपणे प्रेक्षकांचे मनोरंजन करत होता. मात्र, हा शो संपल्यानंतर प्रेक्षकांनी त्यांना दु:ख झाल्याच्या भावना व्यक्त केल्या होत्या. या मालिकेतील पात्रे लोकप्रिय ठरली होती. शिवाजी साटम, दयानंद शेट्टी, हृषिकेश पांडे, जान्हवी छेडा, श्रद्धा मुसळे, आदित्य श्रीवास्तव, नरेंद्र गुप्ता आणि मालिकेतील इतर कलाकारांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. सीआयडीमधील एसीपी प्रद्युम्न, दया, अभिजीत, श्रेया, पूर्वी, पंकज, सचिन अशी पात्रे प्रेक्षकांची लाडकी ठरली होती. यामध्ये श्रेया व दया यांच्या जोडीचा चाहतावर्गदेखील निर्माण झाला होता. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या एपिसोड मध्ये श्रेयाची एन्ट्री झाल्याचे पाहायला मिळाले. ती तिच्या लहान मुलीसह दिसली. तिला व तिच्या मुलीला पाहून सीआयडीची संपूर्ण टीम भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.अभिनेत्रीने जान्हवी छेडाने सीआयडीमध्ये श्रेया ही भूमिका साकारली आहे. आता सीआयडी २ मध्ये इतक्या वर्षानंतर अभिनेत्रीला पाहिल्यानंतर प्रेक्षकांना आनंद झाला. मात्र, ती काही सेंकदासाठीच एपिसोडमध्ये दिसल्याने प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त केली. निर्माते तिचा वापर टीआरपीसाठी करतएका नेटकऱ्याने लिहिले,"शनिवारचा एपिसोड खूपच आवडला. पण रविवारचा एपिसोड पाहून अपेक्षाभंग झाला. श्रेयाच्या पुनरागमनाची इतके दिवस वाट पाहिल्यानंतर ती फक्त ३० सेंकदच स्क्रीनवर दिसली. निर्माते फक्त तिचा टीआरपीसाठी वापर करत असल्यासारखे वाटत आहे. " आणखी एका नेटकऱ्याने लिहिले, "माझ्यातली १७ वर्षीय मुलगी रडत आहे.

धनश्री काडगांवकरनेही वटपौर्णिमा साजरी केली

'वटपौर्णिमा' हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. या दिवशी महिलांनी वटवृक्षाची पूजा केल्यास नवऱ्याचे आयुष्य वाढते अशी मान्यता आहे. त्यामुळे आजचा हा वटपौर्णिमेचा सण सर्वसामान्य महिलांपासून ते अगदी अभिनेत्रींपर्यंत जवळपास सगळ्याच साजरा करत आहेत. मराठी मनोरंजन विश्वातील अनेक अभिनेत्रींनी साजऱ्या केलेल्या वटपौर्णिमेचे अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केले आहेत. अशातच अभिनेत्री धनश्री काडगांवकरनेही वटपौर्णिमा साजरी केली असून याची खास झलक तिने आपल्या सोशल मीडियावर शेअर केली आहे. 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेमधून वहिनीसाहेब या भूमिकेमुळे धनश्री घराघरांत पोहोचली. या मालिकेमुळे तिच्या लोकप्रियतेत चांगलीच वाढ झाली. आपल्या विविध भूमिकांमुळे चर्चेत राहणारी धनश्री सोशल मीडियावरही विशेष सक्रीय असते. सोशल मीडियाद्वारे ती चाहत्यांच्या संपर्कात राहत असते.अशातच तिने वटपौर्णिमानिमित्त व्हिडीओ शेअर केला आहे आणि या व्हिडीओसह तिने पोस्टही लिहिली आहे. या पोस्टमध्ये धनश्री असं म्हणते, "लग्न झाल्यापासून खऱ्या आयुष्यात वटपौर्णिमा कधी केलीच नाही. कारण तसा वेळच मिळाला नाही. हा... पण मी केलेल्या प्रत्येक मालिकेमध्ये अगदी आवर्जून नटून थटून ही पूजा केली. यावर्षी म्हटलं चला मार्गदर्शनाला आई पण आहे; तर करूया..."यानंतर ती म्हणते, "खऱ्या आयुष्यात याचे १०० शॉट्स नसतात. ७ म्हणजे ७ च फेरे. फोटो आणि व्हिडीओसाठी काही कमी जास्त नाही. त्यामुळे तेवढ्यात जितकं फुटेज मिळालं तितकंच. तर खऱ्या आयुष्यातली ही माझी पहिली वटपौर्णिमा." यानंतर तिने नवऱ्याचा उल्लेख करत "दुर्वेश हे सगळं तुझ्यासाठी आहे" असं गंमतीने म्हटलं आहे. धनश्रीच्या या व्हिडीओला चाहत्यांनी लाईक्स आणि कमेंट्स करत चांगलाच प्रतिसाद दिला आहे.दरम्यान, धनश्रीबद्दल सांगायचं झालं तर, 'महाराष्ट्राचा सुपरस्टार'मुळे तिला 'माझिया प्रियाला प्रीत कळेना' या मालिकेत काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर ती 'गंध फुलांचा गेला सांगून', 'जन्मगाठ' या मालिकांमध्ये झळकली. 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेतील भूमिकेने तिला प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. याशिवाय ती 'तू चाल पुढं' या मालिकेतही पाहायला मिळाली होती.'वटपौर्णिमा' हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. या दिवशी महिलांनी वटवृक्षाची पूजा केल्यास नवऱ्याचे आयुष्य वाढते अशी मान्यता आहे. त्यामुळे आजचा हा वटपौर्णिमेचा सण सर्वसामान्य महिलांपासून ते अगदी अभिनेत्रींपर्यंत जवळपास सगळ्याच साजरा करत आहेत. मराठी मनोरंजन विश्वातील अनेक अभिनेत्रींनी साजऱ्या केलेल्या वटपौर्णिमेचे अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

ऋषभ पंतचा 'छप्परतोड' षटकार!

इंग्लंड दौऱ्यापूर्वीच्या सराव सत्रात शानदार फटकेबाजी केली

। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

भारतीय कसोटी संघ सध्या इंग्लंडमध्ये सराव करत आहे. आगामी इंग्लंड दौऱ्यापूर्वी भारतीय संघ लंडनमध्ये पोहोचला आहे. जिथे दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाईल. भारतीय संघाचे वरिष्ठ खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केल्यानंतर भारतासाठी ही कसोटी मालिका महत्त्वाची असणार आहे.

शुबमन गिलला संघाचे कर्णधारपद दिले आहे, तर ऋषभ पंत हा उपकर्णधार असणार आहे. इंग्लंडमधील सरावाचे अनेक फोटो, व्हीडिओ शेअर केले जात आहे. दरम्यान ऋषभ पंतचा एक व्हीडिओ व्हायरल होतोय, ज्यामध्ये फलंदाजी करताना त्याने लगावलेल्या षटकाराने स्टेडियममधील एका भागाचे छप्पर तुटले आहे. भारताच्या सराव सत्रादरम्यान, पंतने स्फोटक फलंदाजी करत फिरकीविरूद्ध काही मोठे फटके खेळले. पंतला फिरकीपटू वॉशिंग्टन सुंदर गोलंदाजी करत होता. पंतने त्याच्या गोलंदाजीवर एक दणदणीत षटकार खेचला, जो स्टेडियमच्या छतावर पडला आणि छताच्या काही भागाचे नुकसान झाले.पंतला भारताचा नवीन उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले. इंग्लंडमधील गेल्या मालिकेतील कामगिरीमुळे आगामी हंगामात संघाच्या यशासाठी त्याचा फॉर्म अत्यंत महत्त्वाचा ठरेल. इंग्लंडमधील १७ डावांमध्ये त्याने ३२.७० च्या सरासरीने ५५६ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये दोन शतकं आणि २ अर्धशतकं आहेत.

नुकत्याच झालेल्या आयपीएलमध्ये ऋषभ पंत खराब फॉर्मातून जात होता. त्याने १३ डावांमध्ये २४.४५ च्या सरासरीने फक्त २६९ धावा केल्या ज्यामध्ये एक शतक आणि एका अर्धशतकाचा समावेश आहे. पहिल्या १२ डावांमध्ये अपयशी ठरल्यानंतर पंतला आरसीबी विरुद्धच्या शेवटच्या लीग सामन्यात सूर गवसला आणि त्याने या सामन्यात शतकी कामगिरी केली.पंतने ६१ चेंडूत ११ चौकार आणि ८ षटकारांसह ११८ धावांचा शानदार खेळी केली आणि लखनौ सुपर जायंट्सला ३ बाद २२७ च्या मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. पण लखनौचा संघ मात्र जिंकू शकला नाही. जितेश शर्माने ८५* (३३) धावांची उल्लेखनीय खेळी करत आरसीबीला विजय मिळवून दिला.खराब फॉर्मातून सुरूवात केली असली तरी पंतने शेवट मात्र चांगला केला. त्याचा हा फॉर्म इंग्लंड मालिकेत महत्त्वपूर्ण असणार आहे. २०२२ मध्ये भारताने इंग्लंडमध्ये खेळलेल्या शेवटच्या कसोटी सामन्यात पंतने शतक झळकावत संघाचा डाव सावरला होता.शुबमन गिलला संघाचे कर्णधारपद दिले आहे, तर ऋषभ पंत हा उपकर्णधार असणार आहे. इंग्लंडमधील सरावाचे अनेक फोटो, व्हीडिओ शेअर केले जात आहे. दरम्यान ऋषभ पंतचा एक व्हीडिओ व्हायरल होतोय, ज्यामध्ये फलंदाजी करताना त्याने लगावलेल्या षटकाराने स्टेडियममधील एका भागाचे छप्पर तुटले आहे.भारताच्या सराव सत्रादरम्यान, पंतने स्फोटक फलंदाजी करत फिरकीविरूद्ध काही मोठे फटके खेळले.

ऋषभ पंतला सूर गवसला

पंतला फिरकीपटू वॉशिंग्टन सुंदर गोलंदाजी करत होता. पंतने त्याच्या गोलंदाजीवर एक दणदणीत षटकार खेचला, जो स्टेडियमच्या छतावर पडला आणि छताच्या काही भागाचे नुकसान झाले.पंतला भारताचा नवीन उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले. इंग्लंडमधील गेल्या मालिकेतील कामगिरीमुळे आगामी हंगामात संघाच्या यशासाठी त्याचा फॉर्म अत्यंत महत्त्वाचा ठरेल. इंग्लंडमधील १७ डावांमध्ये त्याने ३२.७० च्या सरासरीने ५५६ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये दोन शतकं आणि २ अर्धशतकं आहेत. नुकत्याच झालेल्या आयपीएलमध्ये ऋषभ पंत खराब फॉर्मातून जात होता. त्याने १३ डावांमध्ये २४.४५ च्या सरासरीने फक्त २६९ धावा केल्या ज्यामध्ये एक शतक आणि एका अर्धशतकाचा समावेश आहे. पहिल्या १२ डावांमध्ये अपयशी ठरल्यानंतर पंतला आरसीबी विरुद्धच्या शेवटच्या लीग सामन्यात सूर गवसला आणि त्याने या सामन्यात शतकी कामगिरी केली.

पुरनची २९व्या वर्षी क्रिकेटमधून निवृत्ती

निकोलस पुरनने भावुक पोस्ट शेअर करत निवृत्तीची घोषणा

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

वेस्ट इंडिजचा विस्फोटक फलंदाज निकोलस पुरनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. वयाच्या २९व्या वर्षी त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला निरोप दिला आहे. निकोलस पुरनच्या निवृत्तीच्या निर्णयाने सर्वच क्रिकेटप्रेमींना धक्का बसला आहे. आधुनिक क्रिकेटमधल्या तडाखेबंद फटकेबाजी करणाऱ्या फलंदाजांमध्ये पूरनचा समावेश होतो.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली असली तरी तो फ्रँचायझी क्रिकेट मात्र खेळत राहणार आहे. निकोलस पुरनने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत आपल्या निर्णयाची माहिती चाहत्यांनी दिली आहे. वेस्ट इंडिजच्या टी-२० तसंच एकदिवसीय संघाचा महत्त्वाचा भाग असलेल्या पूरनची आंतरराष्ट्रीय कारकीर्द सुमारे नऊ वर्षांची होती.

त्याने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये बांगलादेशविरुद्ध वेस्ट इंडिजसाठी शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. त्याने २०१६ मध्ये वेस्ट इंडिजसाठी टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. पूरनची आक्रमक फलंदाजी आणि विकेटकीपिंगमुळे तो संघाचा एक महत्त्वाचा भाग बनला. पूरनने वेस्ट इंडिजसाठी एकदिवसीय आणि टी२० क्रिकेटमध्ये अनेक संस्मरणीय खेळी खेळल्या. निकोलस पुरनने सोशल मीडियावर वेस्ट इंडिजच्या जर्सीमधील फोटोसह एक कॅप्शन लिहित ही भावुक पोस्ट शेअर केली. त्या फोटोवर लिहिलं आहे की, "सर्व क्रिकेट चाहत्यांसाठी... मी खूप विचार केल्यानंतर, मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. आपल्या या आवडत्या खेळाने खूप काही दिलं आहे आणि पुढेही देत राहील – आनंद, अनेक आठवणी आणि वेस्ट इंडिज संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी. "मरुन रंगाची जर्सी परिधान करणं, राष्ट्रगीतासाठी उभे राहणं आणि मैदानावर पाऊल ठेवताना प्रत्येक वेळी सर्वस्व देऊन कामगिरी करणं... या सर्व गोष्टी माझ्यासाठी किती महत्त्वाच्या आहेत हे शब्दात सांगणं अवघड आहे. कर्णधार म्हणून संघाचं नेतृत्व करणे हा एक सन्मान आहे जो मी नेहमीच माझ्या हृदयात ठेवेन. चाहत्यांच्या अपार प्रेमाबद्दल त्यांचे आभार. तुम्ही कठीण काळात मला साथ दिली आणि चांगले क्षण उत्साहाने साजरे केले. माझ्याबरोबर या प्रवासात साथ दिल्याबद्दल माझे कुटुंब, मित्र आणि सहकाऱ्यांचे आभार. तुम्हा सगळ्यांच्या पाठिंब्यामुळे ही वाटचाल शक्य होऊ शकली.", असं म्हणत निकोलस पुरनने निवृत्ती जाहीर केली.

चाहत्यांच्या प्रेमाबद्दल आभार

पूरनने वेस्ट इंडिजसाठी ६१ एकदिवसीय सामन्यांमध्ये ३९.६६ च्या सरासरीने १९८३ धावा केल्या, ज्यामध्ये ३ शतकं आणि ११ अर्धशतकांचा समावेश आहे. तर, टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात त्याने १०६ सामन्यांमध्ये २२७५ धावा केल्या, यादरम्यान त्याचा स्ट्राईक रेट १३६.३९ होता. याशिवाय, तो एक उत्कृष्ट यष्टिरक्षक देखील आहे.

महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
। दि. 11 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

पशुधन वाचवण्यासाठी मोहीम
लम्पीरोगप्रतिबंधात्मक मोफत लसीकरण!

» दिनेश यादव यांचा पुढाकार ; मोफत लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गायी - म्हशींना लम्पी या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. रोग झाल्यावर तात्काळ निदान करण्यासाठी आवश्यक सोयी सुविधा प्रदान करण्यासाठी योग्य त्या सूचना देण्यात आल्या असून तो रोग होऊच नये यासाठी जनजागृती आणि लसीकरण मोहीम राबविण्यात येत असल्याचे माजी स्वीकृत नगरसेवक दिनेश यादव यांनी सांगितले.

पशुधनाला लंपे आजारापासून दूर ठेवून त्यांचे संरक्षण करण्यासाठी मोफत लसीकरण मोहिमेचा प्रारंभ केला असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

जनावरांमधील लंपी या साथीच्या रोगाला आळा घालण्यासाठी चिखली,कुदळवाडी ,बालघरेवस्ती, येथे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली व दिनेश यादव यांच्या सहकार्याने वेगाने लसीकरण सुरु करण्यात आली आहे. यानिमित्ताने जनावरांची पाहणी करून त्यांना लसीकरण करण्यात आले.

याबाबत दिनेश यादव म्हणाले पशुधनाची पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे चिखली, कुदळवाडी ,बालघरेवस्ती येथे लसीकरण मोहीम योग्य पद्धतीने राबवली. शेतकऱ्यांनी पशुधनाची काळजी घ्यावी आणि लम्पीची लक्षणे दिसल्यास तात्काळ पशुवैद्यकीय

पशुधनाच्या सरंक्षणासाठी महापालिकेचा पुढाकार!

लम्पीचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी महानगरपालिकेने जनावरांना उपचार व लसीकरण मोहिमेचे आयोजन केले आहे. तरी सर्व पशुपालकांनी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आपल्या जनावरांचे लसीकरण करून घ्या.जनावरांमध्ये पसरणारा लम्पी हा रोग संसर्गजन्य आहे. त्यामुळे रोग आल्यानंतर उपचार करण्यापेक्षा रोग येऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणं आणि रोग आला तर त्याचा प्रसार होऊ नये याकरिता आवश्यक काळजी घेणं जास्त महत्त्वाचं आहे.

-अरुण दगडे,
पशुवैद्यकीय अधिकारी पिंपरी चिंचवड महापालिका

महिला पोलिस अधिकारी, महिला लोकप्रतिनिधी व एकल महिला यांच्या हस्ते वडाचे वृक्षारोपण!

वटपौर्णिमेनिमित्त वडाचे वृक्षारोपण करत " कृष्णाली फाऊंडेशन'ने " घातला नवा पायंडा

। आहिल्यानगर । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

वटपौर्णिमा सणाचे औचित्य साधत कृष्णाली फाऊंडेशनच्या वतीने एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला, वड या कल्पवृक्षाचं अत्यंत महत्त्व आहे, धार्मिक कार्यात वडाला अनन्यसाधारण असं महत्त्व आहे, आता देशी झाडांचे प्रमाण कमी होत आहे, वडाच्या झाडापासून सगळ्यात मोठा ऑक्सिजनचा पुरवठा केला जातो, वटपौर्णिमेला सुवासिनी महिला या वडाच्या झाडाकडे आपल्या सौभाग्यासाठी दीर्घायुष्य मागत असतात म्हणून आज महिलांच्या हाताने वडाचे झाड लावण्याचा उपक्रम कृष्णाली फाऊंडेशन'ने हाती घेतला.

वटपौर्णिमा हा सुवासिनीचा सन मानला जातो परंतु कृष्णाली फाऊंडेशन या ठिकाणी एकल महिलांना मान सन्मान दिला आणि त्यांच्या हाताने देखील वडाचे झाड या ठिकाणी रोपण केल, या सामाजिक कार्यक्रमात जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीस दलातील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील मोठ्या उत्साहाने यामध्ये सहभाग नोंदवला. तसेच आपल्या भागात उपक्रम होत असताना स्थानिक महिला लोकप्रतिनिधी यांनी देखील आवर्जून उपस्थित दर्शविली. बहुगुणी असणाऱ्या वडाच्या वृक्षारोपणाने नवं ऊर्जा आणि नवं चेतना मिळाली. या कार्यक्रमासाठी कृष्णाली फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, मा. महापौर रोहिणीताई शेडगे, PSI शितल मुंगडे, पत्रकार प्रियंका पाटील शेळके, हेड कॉन्स्टेबल वैशाली पठाडे, पोलीस नाईक योगिता साळवे, कॉन्स्टेबल सोनाली भागवत आणि मा. नगरसेविका वैशाली नळकांडे , मा. नगरसेविका सविता शिंदे, जयश्री देवतरसे गणेशनगर सोसायटी उपाध्यक्ष गायत्री सतीश बागडे, आशा शेळके, ताराबाई शिंदे, साधना गरड, शुभांगी भगने, भारती कोमकुल, जयश्री सोनवणे, सुवर्णा इरोळे, ज्योती रासकर, कामिनी बोराडे आणि परिसरातील महिला वर्ग उपस्थित होत्या. या प्रसंगी मान्यवरांचा गुलाबाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी बालाजी फाउंडेशनचे विशेष सहकार्य लाभले, यावेळी अध्यक्ष मेजर शिवाजी पठाडे, राज ठाणगे, गणेश शिंदे गणेशनगर सोसायटी चेअरमन उपस्थित होते.

चिखली परिसरात वटपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानच्या वतीने वटवृक्षाच्या रोपांचे वाटप

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

पती- पत्नीचे नातं सात जन्म टिकावे यासाठी ज्येष्ठ पौर्णिमा अर्थात वटपौर्णिमेला सुवासिनींनी वडाची पूजा करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी साकडे घातले. यानिमित्त चिखली येथील महात्मा फुलेनगरमधील श्री गणेश मंदिराच्या प्रांगणात मोठ्या वटवृक्षाखाली सुवासिनींची गर्दी झाली होती.

आख्यायिकेनुसार सत्यवान आणि सावित्री या दाम्पत्याच्या आयुष्यात आलेला एक दिवस म्हणून वटपौर्णिमा आधुनिक युगातही तितक्याच पारंपरिक पद्धतीने साजरा केली जात आहे. हिंदू धर्मातील सण, प्रथा, परंपरा या निसर्गाच्या संस्कृतीशी जोडल्या गेल्या आहेत. जन्मोजन्मी हाच पती मिळावा यासाठी मनोभावे सौभाग्यवतींनी पूजा केली.

सौभाग्याचे लेणं लेवून मिळेल तिथे वडाच्या झाडाची पूजा करण्यासाठी पोहोचल्या. सुवासिनींनी बाजारातून वडाची फांदी आणून घरीच किंवा अपार्टमेंटच्या बेसमेंटमध्ये, मोकळ्या पटांगणात पूजा न करता परंपरेनुसार वडाच्या झाडाला सुवासिनींनी सात फेरे मारीत धागा बांधावा व आपण दरवर्षी एक वडाचे झाड लावून त्याचे संवर्धन करावे असे सामाजिक कार्यकर्ते यशवंत कन्हेरे यांनी सांगितले. त्यानंतर तिथे उपस्थित ब्राह्मणांना दान-दक्षिणा देत इतर सुवासिनींनी सौभाग्याचे लेणे हळद-कुंकू लावून, आंब्यांचे वाण देऊन ओट्या भरल्या.

वटपौर्णिमेनिमित्त महिलांकडून एकमेकींना शुभेच्छाही दिल्या जात होत्या. सिद्धार्थ गौतम बुद्ध उद्यानातील भल्यामोठ्या डेरेदार वटवृक्षाची पूजा करण्यासाठी महिला वर्गाची झुंबड उडाली होती. त्या ठिकाणी उत्सवाचे रूप आले होते. मंदिराच्या ठिकाणी केळी, सफरचंद, आंबा, जांभूळ आदी वटपौर्णिमेच्या पूजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठेत पतीसह महिलांची गर्दी होती.

स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देत वटपौर्णिमा साजरी

पिंपळे गुरव येथे गेल्या दहा वर्षापासून पुरुष वटपौर्णिमा मानवी हक्क संरक्षण आणि जाग्रतीच्या वतीने होत असते. पण हे वर्ष आपवाद ठरले आहे, कारण शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांनी पुरुष वटपौर्णिमा यावर्षी होणार नाही म्हणून कार्यकर्ते व नागरिकांना संदेश दिला. पण घेतलेला वसा कोणत्या परिस्थितीत बंद करायचा नाही असा निर्णय घेतला. स्त्री पुरुष समानतेसाठी वटपौर्णिमा साजरी करण्याचा पायंडा बंद पण झाला नाही पाहिजे म्हणून आम्ही दोघा पती-पत्नीने वटपौर्णिमा साजरी केली.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

55+ NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

11+ CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

17k+ 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

600+ TEACHING AND NON TEACHING STAFF

13k+ 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS

BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826

alandi@priyadarshanischools.org

www.priyadarshanischools.org

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD

शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26
ADMISSIONS OPEN

प्रज्ज्वलितो ज्ञानमियो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

मोरया शिक्षण संस्था. चिंचवड
डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण

* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी:
  १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर,
गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००

BLOSSOM YOUR KNOWLEDGE

Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE

ADMISSIONS OPEN

2025-26

PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY

For more info

95277 64646 / 77967 67292